JNU, NEW DELHI HAS UPLOADED THE JOURNAL IN UGC-CARE. (RTI)
Page 55-59 |http://www.epitomejournals.com Vol. 9, Issue 1, January 2023, ISSN : 2395-6968

# महाराष्ट्रातील रेशीम शेतीचे अर्थचक्र : एक अभ्यास

**वर्षा दामोदर शिंदे**
**पीएच.डी. संशोधिका**
अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
ईमेल- varsha.shinde1989@gmail.com
मो. 8237722130

**गोषवारा :**

जर फॅशन ही उत्कृष्ट कला असेल तर रेशीम हा त्याचा सर्वात मोठा कॅनव्हॉस आहे आणि जर रेशीम हा कॅनव्हॉस असेल तर त्याचे सर्व विणकर, रंगरंगोटी करणारे, डिझायनर, भरतकाम करणारे महान कलाकार आहेत. सिल्क हा एक नैसर्गिक रेशीम धागा आहे जो एक सुरवंटाद्वारे एकल फिलामेंट म्हणून द्रव अवस्थेतील स्त्रवलेल्या प्रथिनांपासून कोष बनले जाते जे रेशीम कोष म्हणून प्रसिद्ध आहे. रेशीम शेती, रेशीम किड्यांचे उत्पादन आणि विक्री यामुळे ग्रामीण भागातील एक आशादायी उद्योग बनत चालला आहे. रेशीम उद्योग हा कमीत कमी कालावधीत कमी श्रमात जास्त उत्पन्न देणारा असा उद्योग असून परकीय चलन व रोजगार निर्मितीक्षम असा उद्योग आहे. रेशीम शेतीची विभागणी दोन क्षेत्रात केली जाते रेशीम शेती व उद्योग. भारतामध्ये 22 राज्यांमध्ये हा शेती उद्योग व्यापला असून सुमारे 25800 इतके मनुष्यबळ यामध्ये कार्यरत असून 54000 खेड्यांमध्ये 17200 हेक्टर क्षेत्र याने व्यापलेले आहे. तर महाराष्ट्रात एकूण 17835.00 हेक्टर इतके लागवड असून महाराष्ट्र राज्यहे अपारंपरिक राज्यांमध्ये प्रथम क्रमांकावर असून राज्यातील मराठवाडा विभाग हा विभागनिहाय बघितल्यास प्रथम क्रमांकावर आहे.

**Keywords -** रेशीमचे महत्व, रोजगार, रेशीमला भविष्यातील मागणी

**प्रस्तावना :**

जागतिक स्तरावर बघितल्यास भारत हा चीननंतर दुसऱ्या क्रमांकाचा देश असून भारतात पारंपरिक व अपारंपरिक अशा दोन्ही पद्धतीने उत्पादन घेतले जाते. रेशीम शेतीचा इतिहास 27 व्या इसवी सन पूर्व चीनमध्ये सुरू झाला. तर भारतात महाभारत, बौद्ध काळापासून रेशीमच्या वापराच्या नोंदी आढळतात. भारतात सर्वप्रथम म्हैसूरचा टिपू सुलतान याने रेशीम शेतीला प्रोत्साहन दिले. भारतामध्ये कर्नाटक राज्यातील सर्वाधिक कच्चे रेशमाचे उत्पादन घेतले जात असून महाराष्ट्र राज्यात अपारंपरिक राज्यामध्ये प्रथम उत्पादन घेणारे राज्य बनले. महाराष्ट्रात रेशीम उद्योग मोठ्या प्रमाणात वाढत असून वस्त्रोद्योग मंत्रालयांतर्गत 1 सप्टेंबर 1997 मध्ये स्वतंत्र रेशीम संचालनालयाची स्थापना करण्यात आली. त्यामुळे 1 सप्टेंबरला रेशीम दिवस म्हणून ओळखले जाते.

रेशीम उद्योग म्हणजे कोष अळ्यांचे संगोपन करून कोषाची निर्मिती करणे यालाच रेशीम उद्योग असे म्हणतात. रेशीम हा एक बारीक चमकदार फायबर आहे ज्यापासून कपडे विणले जातात. हे कापड फिलामेंट्स पेशीमध्ये राहणाऱ्या बर्मीपासून तयार केले जाते. रेशीमचे अळ्यांच्या खाद्यावरून चार प्रकार पडतात. 1. तुती रेशीम 2. टसर रेशीम 3. मुगा रेशीम 4. एरी रेशीम इत्यादी रेशीम च्या अनेक वाण असून महाराष्ट्रात बायव्होल्टाईनपासून तुतीचे 90 टक्के उत्पादन घेतले जाते.

**रेशीमचे महत्व :**

तुतीची रेशीम किडे संगोपन पशुपालन या व्यवसायांतर्गत येत असून ज्यात तुतीची लागवड रेशीम किडा संगोपन आणि रेशीम कोष इत्यादी प्रार करावे लागतात. रेशीम शेती कृषीवर आधारित असून उत्कृष्ट जोडधंदा असल्यामुळे एकदा लागवड केल्यानंतर 10 ते 15 वर्ष लागवडीचा खर्च नाही. रेशीम कोष शासन आधारभूत

दराने खरेदी व्यवस्था असल्याने ग्रामीण युवक व बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध आहे. तसेच महिन्याला पगारासारखे महत्व मिळते. घरातील वृद्ध व्यक्ती, स्त्रिया, मुले, अपंग व्यक्तीदेखील रेशीम शेती उद्योगात घरातच स्वयंरोजगार मिळवू शकतात. अल्प गुंतवणूक, कमी श्रम, कमी वेळेत शाश्वत व अधिक उत्पन्न मिळते. रेशीम अळ्यांची विष्ठा दुभत्या जनावरांना सुग्रासप्रमाणे खाद्य म्हणून वापरता येते. वाळलेला पाला व विष्ठेचा गोबरगॅसप्रमाणे उपयोग करून उत्तम प्रकारे गॅस मिळतो. रेशीम उद्योगापासून देशाला परकीय चलन मिळते व देशाच्या विकासास हातभार लागतो व तुतीची जी दरवर्षी तळ छाटणी करून त्या छाटणीपासून मिळणारी तुती कोष शासन खरेदी करते. ज्यामध्ये प्रती एकर 3500/ रूपये ते 4500 रूपये जास्तीचे उत्पन्न प्रतिवर्षी मिळते. तुतीच्या पानामध्ये 'अ' जीवनसत्वे असल्यामुळे आयुर्वैदिकदृष्ट्या तुतीचा पाला व रेशीम कोश खूप महत्त्वाचा आहे. विदेशात तुतीच्या पानांचा चहा करतात, ज्याला मलबेरी टी म्हणतात. प्युपा कोशापासून आयुर्वेदिक औषधी व सौंदर्यप्रसाधन उद्योगात उपयोग होतो. म्हणूनच चीन, भारत, ब्राझील, थायलंड, व्हिएतनाम, इंडोनेशिया, इजिप्त, इराण, श्रीलंका, फिलिपिन्स, बांगलादेश, नेपाळ तुर्की, म्यानमार, आफ्रिकन व लॅटीन अमेरिकतेत काही देश ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळावा म्हणून रेशीम शेती करतात.

**रोजगार :**

राज्यात गेल्या सन 2018 पासून वर्षात रेशीमच्या उत्पन्नात दुपटीने वाढ झाली असून तुती लागवड क्षेत्र सुमारे 17 हजार 815 एकर क्षेत्र एवढे आहे. सुमारे 16 हजार 675 शेतकरी रेशीम शेती करत असून 21 लाख लोकांना त्याद्वारे रोजगार निर्मिती झाली आहे. सन 2018 -19 मध्ये 54.60 लाख लोकांना रोजगार निर्माण झाला असून सन 2020-21 मध्ये 16.6 लाख लोकांना रोजगार प्राप्त झाला. यामध्ये शेतीतील मजुरांपेक्षा कमी मजूर लागत असले तरी रेशीम संगोपन, रेशीम कोष यामध्ये

लोकांचा सहभाग विशेषत: महिलांचा सहभाग दिसून येतो. रेशीम शेती उद्योगात प्रतिमानशी 11 जण लागतात. यावरून रेशीमची रोजगार निर्मिती होते.

**रेशीमला भविष्यात मागणी :**

जागतिक रेशीम उत्पादन सुमारे 70,000 ते 90,000 मेट्रीक टन मध्ये होताना रेशीमची मागणी दरवर्षी 5 टक्के वाढत असते. लोकसंख्येच्या वाढीसह आणि विकसित देशांमधील फॅशन डिझाईनच्या वेगाने बदलणाऱ्या फॅशनेबल कपड्यांच्या वस्तुच्या वाढीच्या मागणीमुळे रेशीमची मागणी जास्त प्रमाणात वाढलेली आहे. रेशीमच्या लागवडीमुळे पर्यावरणाचे रक्षण रेशीम उद्योग, सुत व कापड उत्पादन स्वयंरोजगार निर्मिती, ग्रामीण भागातून शहरी भागात होणारे स्थलांतर रेशीम उद्योगामुळे थांबवता येईल. चीन देशाचे रेशीम धाग्याचे उत्पादन अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात घटत आहे. सन 2015 मध्ये 170,000 मे टन असणाऱ्या रेशीम 2016 मध्ये 93 टक्के तर 2020 मध्ये 31.38 टक्के एवढे कमी झाले.

कोरोना काळामध्ये महाराष्ट्रातील रेशीमला संधी असून प्रती क्विंटल एक लाख रूपये इतक्या भावाने कोष विक्री होत आहे. सन 2020-21 मध्ये 70 ते 80 हजार क्विंटल भावाने कोष विक्री होत असून इतर शेतमालाच्या तुलनेत उत्पन्नाच्या सर्व विक्रम मोडित काढले.

**समारोप :**

भारतातील महाराष्ट्र राज्यातील नैसर्गिक वातावरण, मुबलक सुपीक जमीन, वर्षभर भरपूर सुर्यप्रकाश, उपलब्ध मोठे तांत्रिक मनुष्यबळ कौशल्याची परंपरा, पारंपरिक पद्धतीने होणारा रेशीम वस्त्राचा सहज वापर तसेच उपलब्ध शास्त्रीय संशोधन बघता नजीकच्या काळात भारत दुसऱ्या स्थानांवरून रेशीम उत्पादनात जगात अग्रस्थानी पोहोचेल ज्यातून कोट्यावधी रोजगाराच्या संधी प्राप्त होऊन भारतातील अर्थचक्रास वाव मिळेल.

**संदर्भ सूची :**


1. www.inserco.org
2. https://mahasilk maharashtra.gov.in
3. www.fao.in
4. रेशीम संचलनालय, महाराष्ट्र शासन
5. शेतकरी मासिक, जुलै 2020